# सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
## प्रभाग समिती क्र. २
## जाहिर निविदा सुचना क्र. ०१/२०२०-२१

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. २ मार्फत कोणत्याही सुशिक्षित बेरोजगार अभियंता/ मजूर सहकारी सोसायटी / मंडप डेकोरेटर नोंदणी प्रमाणपत्र असलेले मक्तेदार यांचेकडून खाली नमुद केलेल्या कामासाठी मनपाचे www.smkc.gov.in या संकेतस्थळावर जाहीर निविदा प्रसिध्द करुन दोन लिफाफा पध्दतीनुसार निविदा मागविणेत येत आहेत. सदरच्या निविदा प्रभाग समिती क्र. २ चे कार्यालयाच्या बाननिशी विभागामध्ये स्विकारल्या जातील.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजीत रक्कम रूपये | निविदा फॉर्म फि | मुदत | वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | सां.मि.कु.महानगरपालिका क्षेत्रातील सांगली वॉर्ड क्र. १७, १८, १९ मधील कोव्हीड-१९ प्रादुर्भाव कमी करणेसाठी कोरोना प्रतिबंधित भागामधील रस्ते बंद करणेकरीता बॅरिकेटींक करणे. | १,४८,६००/- | २०० | ३० दिवस | ९ व त्यावरील |
| २ | सां.मि.कु.महानगरपालिका क्षेत्रातील सांगली वॉर्ड क्र. १० मधील कोव्हीड-१९ प्रादुर्भाव कमी करणेसाठी कोरोना प्रतिबंधित भागामधील रस्ते बंद करणेकरीता बॅरिकेटींक करणे. | ५३,८००/- | २०० | ३० दिवस | ९ व त्यावरील |

**टिप :-**

१. वरील कामासाठी बयाणा रक्कम निविदा रक्कमेच्या १% व सुरक्षा अनामत ५% राहिल.

२. संपूर्ण निविदा प्रक्रिया म्हणजेच अर्ज विक्री व सादरीकरण व निविदा स्विकृती प्रभाग समिती क्र. २ चे पुजारी प्लॉट १०० रोड गणपती मंदिर पाटीमागे येथील कार्यालयात कार्यरत राहील.

३. निविदा संचाची विक्री प्रभाग समिती क्र. २ चे कार्यालयात अधिकृत नोंदणी केलेल्या ठेकेदारांना मंडप डेकोरेटर नोंदणी प्रमाणपत्र असलेले मक्तेदार यांना प्रसिध्दीच्या दिनांकापासून कोरे निविदा फॉर्म दि. ४ / ९ /२०२० रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत देणेत येतील व निविदा प्रभाग समिती क्र. २ चे कार्यालयात दि. 06/09/२०२० अखेर सायं. ३.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

४ प्राप्त निविदा दि. ८/09/२०२० रोजी दुपारी ०४.०० वा. निविदा ओपनिंग कमिटीसमोर उघडण्यात येतील.

५ उक्त कामाच्या निविदा अटी व शर्ती स्वाक्षरी करुन पहिल्या लिफाफ्यासोबत जोडण्याच्या आहेत.

६ कोणतीही निविदा स्वीकारणेचा अथवा नाकारण्याचा अधिकार महापालिकेने राखनू ठेवलेला आहे.

७ निविदा प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. २ येथे संपर्क साधवा.

८ वरील प्रमाणे खुल्या प्रवर्गासाठी मागविण्यात आलेल्या निविदेमध्ये कोणत्याही शासकीय विभागाकडील नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता तसेच मजूर सहकारी सोसायटी मक्तेदार, निविदेमधील नमूद मक्तेदार वर्ग व पात्रतेनुसार व नोंदणीकृत मंडप डेकोरेटर्स उक्त निविदेमध्ये सहभाग होऊ शकतात.

९ सदर कामासाठी बयाणा रक्कम युनियन बँक ऑफ इंडिया,महानगरपालिका खाते क्र. **४२४२०२०१०५०२७०८ या** खातेवर भरणेचे आहे.

१० सदर कामास शर्ती अटी टेंडर शर्ती अटी प्रमाणे राहतील.

(एस. एस. खरात)
**सहा.आयुक्त,**
प्रभाग समिती क्र. २
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

**सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका**
**(सार्व .बांधकाम)**
**निविदा अटी व शर्ती**
**(जाहिर प्रकटन क्रमांक १२/२०१९-२० )**

१. निविदा दोन लिफाफा पध्दतीने देणेचे आहे.

२. **अ) महापालिका नोंदणी वर्ग प्रमाण पत्र**
**ब) बयाणा रोखीने भरलेले बँकेचे चलन असणे आवश्यक आहे.**
**क) हाती असलेल्या व झालेल्या कामाचे अद्यावत दाखले**
**ड) व्यवसायकर ना देय प्रमाणपत्र**
**इ) फक्त डांबरी रस्ते (ॲसफॉल्ट कॉक्रीट) साठी मक्तेदारांना कामाच्या ठिकाणापासून २० कि.मी. पर्यंतच्या अंतराच्या आत स्वतःचा Ministry of surface transport (MOST) Specification १९९५ clause ५०४.३.४ प्रमाणे हॉटमिक्स प्लॅन्ट असलेली सर्व कागदपत्र**

३. (वरील सर्व कागदपत्राची छायांकीत प्रत सत्य प्रती म्हणून सक्षम अधिकाऱ्याकडून स्वाक्षांकीत करुन सादर करणेत यावी.)

४. कोणतीही निविदा मंजूर / ना मंजूर करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे.

५. निविदा फॅार्मच्या अनुषंगाने अंदाजपत्रके / इतर माहितीसाठी मक्तेदार / पुरवठादार यांनी संबंधीत विभाग प्रमुंखाकडून माहिती घेण्ची आहे.

६. आलेल्या निविदा दिनांक ८/६ /२०२० रोजी दुपारी ४.०० वाजता निवीदा ओपनिंग कमिटी समोर उघडल्या जातील.

७. बयाणा रक्कम बँकेचे चलन या स्वरुपात स्विकारली जाईल.

८. वरील कामासाठी अंदाजपत्रकामध्ये नमुद केलेल्या साठयाचा पुरवठा ठरवून दिलेल्या वर्णनानुसार/दरानुसार करणे बंधनकारक राहील.

९. इमारत व दळणवळण विभागाचे / कामागार कायदा / रॉयल्टी वैगेरे तरतूदी बंधनकारक राहतील.

१०. मक्तेदारांनी महानगरपालिकेच्या कामासाठी बाहेरून आणलेल्या मालावर एल.बी.टी. माफी दिली जाणार नाही.

११. कामगिरीस मशिनरी महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेस ठरवून दिलेल्या भाडयाप्रमाणे पुरविण्यात येईल. जेव्हा महानगरपालिकेकडे मशिनरी नसेल तेव्हा मक्तेदारांनी स्वतः बाहेरून मशिनरी आणून कामगिरी पूर्ण करणेची आहे.

१२. एस्टीमेंटमधील प्रत्येक जातीच्या एकूण जातीच्या एकूण क्वांटीटी अंदाजित आहेत. प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या मापावर बीले केली जातील.

१३. नकाशा व स्पेसिफीकेशन प्रमाणे आणि सिटी /सॅनिटरी/ वॉटर वर्क्स इंजिनियर वेळोवेळी करतील ते हुकूम त्या पध्दतीने व तसे सर्व काम अगर कामाचा कोणताही भाग पूरा करणेचा आहे. नकाशे व अंदाजपत्रक व कामाचे खुलासेवार वर्णन यांच्या प्रति मंजूर मक्तेदारास दिल्या जातील.

१४. मुळ स्पेसिफीकेशन, ड्रॉईंग्ज, डिझाईन्स आणि इंन्स्ट्रक्शन या मध्ये काम सुरु झालेनंतर बदल करणेचा किंवा वाढ करण्याचा महानगरपालिकेस पूर्ण अधिकार राहतील. आणि या प्रमाणे केलेला बदल किंवा वाढ कॉन्ट्रक्टरने पुरा केला पाहिजे. अशी पुर्तता करताना मुळ कामाच्या सर्व अटी प्रमाणे काम केले पाहिजे. मात्र अशा तऱ्हेच्या बदल किंवा वाढ करण्यास सिटी इंजिनियर/ संबंधीत विभाग प्रमुख हे आगाऊ लेखी हुकूम देतील व कॉन्ट्रक्टरने ते तसे केले पाहिजे.

१५. बदल केलेले किंवा वाढ केलेले काम कॉन्ट्रक्टरने मुळ एस्टीमेंट दराप्रमाणे करणेचे आहे.

१६. बदल केलेल किंवा वाढ केलेले कामाबद्दलचे ॲटम एस्टीमेंट मध्ये नसेल तर मा.आयुक्त यांच्या मान्यतेचे दर ठरविले जातील असा ठरविलेला दर मंजूर दराने यादीतील असलेले दरापेक्षा जास्त असता कामा नये. मात्र ज्या कमिशन प्रमाणे टेंडर मंजूर झाले आहेत. त्या कमिशन प्रमाणे सदर दराबद्दल आकारणी करण्यात येईल.

१७. बदल केलेल्या किंवा वाढ केलेल्या कामामुळे मूळ दिलेल्या मुदतीपेक्षा जादा मुदत लागल्यास मा. आयुक्त यांच्या सल्याने मंजूर करेल.

१८. विशेष प्रसंगी जरुर त्या कारणासाठी काम तात्पूरते थांबविण्याचा सिटी इंजिनियर / सॅनिटरी/ वॉटर वर्क्स इंजिनियर यांनी कॉन्ट्रक्टर यास हुकूम केल्यास त्या बद्दल कोणत्याही सबबीवर कॉन्ट्रक्टर यास नुकसानी मागता येणार नाही.

१९. कामास दिलेल्या मुदतीचे प्रमाणामध्ये कामाची प्रगती झालीच पाहिजे व तशी झाली नाही. अशी सिटी इंजिनियर/ सॅनिटरी/ वॉटर वर्क्स इंजिनियर यांची खात्री होईल तर कॉन्ट्रक्ट मा.आयुक्त यांच्या मान्यतेने रद्द करुन राहिलेल्या कामाबद्दल टेंडर मागवून अगर अन्य रितीने ते काम पूरे केल्यास जो जादा खर्च येईल तो कॉन्ट्रक्टर कडून वसुल केला जाईल.

२०. काम स्पेसिफीकेशन प्रमाणे मालमसाला वापरून स्पेसिफीकेशन मधील पध्दतीप्रमाणे झालेली नाही असे कोणत्याही पर्यायास सिटी इंजिनियर/ सॅनिटरी/ वॉटर वर्क्स इंजिनियरच्या नजरेस आल्यास सिटी इंजिनियर / सॅनिटरी / वॉटर वर्क्स इंजिनियरची तशी खात्री झाल्यास कॉन्ट्रक्टर यास नोटीस करुन स्पेसिफीकेश प्रमाणे मालमसाला वापरून स्पेसिफीकेशन मधील पध्दतीप्रमाणे कॉन्ट्रक्टर यास काम करणेस सांगितले जाईल. व ते काम कॉन्ट्रक्टर याने केले पाहिजे अशा तऱ्हेच्या निदर्शनास आणण्यापूर्वी कॉन्ट्रक्टरच्या नजरेस ही गोष्ट आणली नाही अशी सबब चालणार नाही नोटीशी प्रमाणे कॉन्ट्रक्टरने काम न केल्यास नापसंत केलेला माल काढून त्याऐवजी योग्य तऱ्हेचा माल वापरून योग्य पध्दतीने कॉन्ट्रक्टरच्या खर्चाने महानगरपालिकेकडून पूर्तता केली जाईल.

२१. फायनल बील होण्यापुर्वी पुराने अपघाताने किंवा दुसऱ्या कोणत्याही आकस्मिक कारणाने कामाचे जे नुकसान होइल त्याची जबाबदारी मक्तेदारावर राहील व त्या कामाची दुरुस्ती किंवा पुन्हा करणे मक्तेदाराला स्वखर्चाने भाग पडेल.

२२. कामावर वापरावयाचा माल महानगरपालिकेच्या सिटी इंजिनियर / सॅनिटरी / वॉटर वर्क्स वॉटर वर्क्स इंजिनियरने किंवा त्यांच्या वतीन कोणीही जबाबदार सेवकाने पंसत केल्याशिवाय तो कामात वापरता कामा नये. नापसंत माल २४ तासाच्या आत मक्तेदाराने कामापासून एक फर्लांगाच्या बाहेर नेवून टाकला पाहिजे तसे न केल्यास नापसंत माल संबंधीत खात्याकडून दुर केला जाईल. व त्याला येणारा खर्च मक्तेदाराकडून वसूल केला जाईल.

२३. महानगरपालिकेचे सिटी इंजिनियर / सॅनिटरी / वॉटर वर्क्स वॉटर वर्क्स इंजिनियर किंवा त्याचे वतीने कोणत्याही जबाबदार इसमाने पाया पसंत केल्याशिवाय तो भरता कामा नये. तसेच जे काम भिंतीस, जमीनीत किंवा इतर ठिकाणी झाकले जावून मागावून त्यांची मापे घेता येणे शक्य नाही अशा तऱ्हेचे असले तर ते झाकण्यापूर्वी मापे घेण्यासाठी मक्तेदाराने चार दिवस आगोदर कळविले पाहीजे. यात हयगय झाल्यास मक्तेदाराने आपल्या स्वखर्चाने झालेले काम उघडे करुन दाखविले पाहीजे.

२४. कोणत्याही कारणासाठी मनपाचे परवानगीशिवाय मक्तेदारास यादीतील काम दुसऱ्यास तबदील करता येणार नाही.

२५. काम चालू असताना मक्तेदाराने अपघात वैगेर टाळण्यासाठी जरुर ते दिवे लावले पाहिजेत. कुंपन केले पाहिजे. योग्य ती काळजी घेतली पाहीजे. यात हयगय झालेस अपघाताने झालेल्या नुकसानीस मक्तेदार जबाबदार राहील.

२६. महानगरपालिकेच्या सिटी इंजिनियर / विभाग प्रमुख यांची परवानगी शिवाय रविवारी काम करता येणार नाही.

२७. कामावर वापरणारा कोणताही इसम योग्य रितीने काम करत नाही असे दिसून आल्यास काम वरुन बंद केले जाईल.

२८. सर्व प्रकारच्या खणीची फी, जकातीचा कर, जमिन भाडे, रॉयल्टी, सर्व प्रकारचे शासकीय कर वैगेरे मक्तेदाराने दिले पाहीजे.

२९. कॉन्ट्रक्टर आपणास नादार ठरवून घेणाचा कोर्टमार्फत अगर अन्य रितीने प्रयत्न करील अथवा आपल्या धनकोशी तशा प्रकारे संगणमत करील असे दिसून आल्यास कॉन्ट्रक्टर रद्द केले जाईल. व शर्त नंबर १७ प्रमाणे तजवीज केली जाईल.

३०. एखाद्या फर्मच्या भागीदारीची टेंडर दिली असल्यास फर्मच्या घटनेतील कोणताही बदल ताबडतोब कॉन्ट्रॅक्टर याने महापालिकेस कळविले पाहीजेत.

३१. सर्व काम इ.स. १९३१ च्या मुंबई पी डब्ल्यु डी बुकाप्रमाणे तसेच रेड बुकातील स्पेसिफीकेशनप्रमाणे महानगरपालिकेचे सिटी इंजिनियर / सॅनिटरी / वॉटर वर्क्स वॉटर वर्क्स इंजिनियर सांगतील त्याचप्रमाणे करावयाचे आहे.

३२. कामावर एखाद्या इसमास दुखापत किंवा अपघात झाल्यास त्याची जबाबदारी मक्तेदारावर राहील.

३३. वर्कमेन कॉम्पेन्सेशंन्स ॲक्टखाली जर महापालिकेवर जबाबदारी बसली तर त्या जबाबदारीची रक्कम कॉन्ट्रक्टर कडून वसुल केली जाईल.

३४. दुष्काळी अगर महामाईच्या काळी त्यातील मजुर महानगरपालिकेने सांगितलेस कॉन्ट्रक्टरने कामावर लावले पाहिजेत.

३५. कामावर लावलेल्या मजुरांची यादी महानगरपालिकेने मागितलेस ती मकतेदाराने दिली पाहिजे.

३६. कामास आरंभ करण्यास विलंब लागल्यास त्याबद्दल मक्तेदारास मोबदला मिळणार नाही.

३७. महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या मुदतीत काम टप्याटप्याच्या गतीने झाले नाही तर दंडाची आकारणी खालील प्रमाणे केली जाईल.

३८. अंदाजीत रक्कमेपेक्षा

रुपये ३,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये ५/ (पाच)

रुपये ३,००१/- ते १०,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये १०/- (दहा)

रुपये १०,००१/- ते २५,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये ३०/- (तीस)

रुपये २५,००१/- ते १,००,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये ५०/- (पन्नास)

रुपये १,००,०००/- ते ५,००,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये ३००/- (तीनशे)

रुपये पाच लाखापेक्षा अधिक रक्कमेच्या कामास दर दिवसास रुपये ५००/- (पाचशे) मात्र दंडाची आकारणी करणेत येईल. व ती रक्कम बिलातून कापुन घेतली जाईल.

३९. काम झाले असल्यास महिन्यातुन रुपये ३०,००० /- वरील कामगिरींना रनिंग बिल मिळेल.

४०. मिनिमम वेजेस ॲक्ट प्रमाणे् कायदयाने जबाबदारी मक्ते्दारावर राहील. त्यास महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

४१. कोणत्याही कामास्तव अॅडव्हान्स दिला जाणार नाही.

४२. एखाद्या फर्म कडून जेव्हा टेंडर दिले जाते तेव्हा ते फर्मच्या प्रत्येक भागीदाराने सही करुन दिले पाहिजे परंतू एखादा भागीदार हजर नसेल त्यावेळी त्यांच्या तर्फे अधिकार पत्र (ॲथोरिटी) असलेल्या दुसऱ्या कोणत्याही इसमास सही करुन देता येईल.

४३. ज्याचे टेंडर मंजूर करण्यात येईल त्याला टेंडर मंजूर झाल्याची पहिली समज दिल्या पासून सात दिवसांचे आत किंवा दुसरी अंतिम समज चार दिवसांचे मुदतीची दिल्यापासून एस्टीमेंट रक्कमेवर २.५% प्रमाणे होणारी सुरक्षा अनामत म्हणून महानगरपालिकेच्या लेखा विभागाकडे (मुख्यालय) रोखीने / बँकेकडील खाते क्रमांक ४२० वर भरली पाहीजे. आणि योग्य स्टॅम्प सांगली हद्दीत लायसेन्स जामिनासह करारपत्र पुरे करुन दिले पाहिजे, २.५% सुरक्षा अनामत रक्कम प्रत्येक रनिंग बीलातून वसुल केली जाईल. मक्तेदाराकडून तसे मुदतीत न झालेस टेंडर बयाणा खास जमा करणेत येईल व मक्ते्दाराचे नांव कॉन्ट्रक्टर नोंदणी कृत नोंद वहीमधून कमी केले जाईल.

४४. टेंडर दिलेनंतर त्या बाबत कसलाही खुलासा किंवा सबब ऐकली जाणार नाही. व त्याचा विचारही केला जाणार नाही.

४५. कॉन्ट्रक्टरने घेतेलेले काम पूर्ण झाल्याबरोबर त्याच दिवशी संबंधीत खात्याकडे कळविणेचे आहे. कामाचे फायनल बिल रेकॉर्ड करुन घेणेची जबाबदारी कॉन्ट्रक्टरवर आहे.

४६. टेंडर मधील करावयाचे कामाचे दर शब्दात, आकडयात दिले पाहिजेत., अटी नमुद केलेल्या सही नसलेली अगर नियमास अनुसरुन नसलेले टेंडर विचारात ठेवले जाणार नाहीत.

४७. रस्ते गटरी इत्यादी कामाची सुरक्षा अनामत कामगिरी पूर्ण झालेपासून तीन महिन्याने व इमारती, महत्वाची बांधकामे या कामाची सुरक्षा अनामत सहा महिन्यानी परत केली जाईल.

४८. मक्तेदाराने महानगरपालिकेच्या कामासाठी बाहेरुन आणलेल्या मालावर एल.बी टी .माफी दिली जाणार नाही.

४९. इलेक्ट्रीकचे काम करताना मक्तेदार यांनी कामगिरी सुरु असताना टेलिफोन केबल्स, पाईप लाईन व इत्यादीस नुकसान झालेस त्याची संपुर्ण जबाबदारी आपणांवर राहील. व होणारे नुकसान आंपण स्वत:भरणेचे आहे.

५०. रॉयल्टी बाबत शासनाने वेळोवेळी निदेशीत केले प्रमाणे रॉयल्टी भरणे कंत्राटदारास बंधनकारक आहे. त्याबाबत कोणतीही सवलत देय नाही. (रॉयल्टी भरले बाबतचा योग्य तो पुरावा कार्यालयाकडे सादर करणे गरजेचे आहे.)

५१. निविदा सूचना मध्ये असलेले डांबरी रस्ते (अॅसफॉल्ट कॉक्रीट) नमुद आहेत. त्या कामगिऱ्या करणेसाठी मक्तेदारांचा २० कि.मी. पर्यंत स्वतःचा हॉटमिक्स प्लॅन्ट व मशिनरी असणे आवश्यक आहे.

५२. शासनाच्या नियमा प्रमाणे व शासनाच्या बांधकाम विभागाकडील दरसुची मध्ये नमुद केलेनुसार लेबर वेलफेर सेस व कॉन्ट्रेक्ट वर्क इन्सुरन्सबाबत प्रत्येक कामावेळी कार्यवाही ठेवणे आवश्यक आहे

५३. लिफाफा क्र. १ मध्ये मक्तेदाराने / मंडप डेकोरेटर्स ठेकेदाराने शासनाकडील नोंदणीकृत प्रमाणपत्र, कामाचे अनुभवाचे दाखले इत्यादी सादर करणेचे आहे.

28.5.20

(एस.एस.खरात)
सहा.आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

**मक्तेदाराची सही**